CNR No. MHCH140006602022

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२५/२०२२ मधील नि. क्र. १ खालील आदेश.

(शांताबाई गणपत मेडपल्लीवार विरुध्द निबंधक जन्म मृत्यु, नगर पंचायात, सावली)

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) व महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम ९(३) अन्वये अर्जदाराचे मुलांचे जन्म तारखेची नोंद होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जदार यांचे असे कथन आहे की, ती मौजे सावली, ता. सावली, जि. चंद्रपुर येथील कायमचे रहिवाशी आहे. नितेश गणपत मेडपल्लीवार व विवेक गणपत मेडपल्लीवार हे अर्जदाराचे मुले आहेत. अर्जदाराचा मोठा मुलगा नामे नितेश गणपत मेडपल्लीवार याचा जन्म दिनांक २३/०१/१९९२ तर लहान मुलगा नामे विवेक गणपत मेडपल्लीवार याचा जन्म दिनांक ०४/१२/१९९४ रोजी त्यांचे वडीलांचे घरी मौजे सावली, ता. सावली, जि. चंद्रपुर येथे झाला आहे. अर्जदारास व तिचे कुटूंबीयांना तिच्या मुलांच्या जन्माची नोंद गैरअर्जदार यांचे अभिलेख सदरी करण्याचे अनावधानाने राहून गेले आहे. अर्जदार यांना शासकिय व निमशासकीय तसेच शेती विषयक कामकाजाकरीता तिच्या मुलांच्या जन्मदाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी त्याबाबतची मागणी गैरअर्जदार यांचे कार्यालयात केली असता अर्जदारास तिचे दोन्ही मुले नामे नितेश गणपत मेडपल्लीवार व विवेक गणपत मेडपल्लीवार यांचे जन्माची नोंद गैरअर्जदार यांचे अभिलेख सदरी नसल्याचे समजले. सबब, अर्जदार यांनी निबंधक जन्म- मृत्यु नोंदणी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, सावली, ता. सावली, जि. चंद्रपुर यांना तिचा मोठा मुलगा नामे नितेश गणपत मेडपल्लीवार याचे जन्म तारखेची नोंद दि. २३/०१/१९९२ व लहान मुलगा नामे विवेक गणपत मेडपल्लीवार याचे

जन्म तारखेची नोंद दि. ०४/१२/१९९४ अशी करण्यास आदेशीत करणेबाबत प्रार्थीले आहे.

३. अर्जदार यांनी निशाणी ०४ च्या यादीलगत तिच्या मुलांच्या जन्माची नोंद नसलेबाबतचा निबंधक जन्म– मृत्यु विवाह नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत सावली यांचा दाखला दाखल केला आहे. त्यावरुन अर्जदार हिच्या मुलांच्या जन्माची नोंद संबंधित कार्यालयात नसल्याचे स्पष्ट होते.

४. अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पुष्टयर्थ निशाणी ०४ च्या यादीलगत अर्जदार व तिच्या मुलांच्या आधार कार्डची सत्यापित प्रत दाखल केल्या आहेत. तसेच अर्जदाराने निशाणी ११ लगत तिच्या मुलांचे शाळा सोडण्याचे प्रमाणपत्राची सत्यापित प्रत दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे, अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पृष्टयर्थ निशाणी १२ कडे स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदार यांनी त्यांच्या अर्जातील कथनास अनुसरुन कथने केली आहेत. तसेच अर्जदारा तर्फे साक्षीदार क्र. २ नितेश गणपत मेडपल्लीवार यांनी निशाणी १३ वर व साक्षीदार क्र. ३ विवेक गणपत मेडपल्लीवार यांनी निशाणी १४ वर त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन अर्जदारांच्या कथनांना समर्थन दिले आहे.

५. अर्जातील कथनास अनुसरुन दि. २०/१२/२०२२ रोजी दैनिक पुण्यनगरी या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदार यांची मुले नामे नितेश गणपत मेडपल्लीवार व विवेक गणपत मेडपल्लीवार यांचे जन्म नोंदीबाबत हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीमध्ये कोणीही हजर राहून अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म नोंदणीबाबत हरकत घेतलेली नाही.

६. अर्जदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन व तोंडी पुराव्यावरुन अर्जदार यांची मुले नामे नितेश गणपत मेडपल्लीवार व विवेक गणपत मेडपल्लीवार यांच्या जन्माची नोंद गैरअर्जदार यांचे अभिलेख सदरी नसल्याचे स्पष्ट होत असल्याने व प्रस्तूत अर्ज जन्मानंतर १ वर्षापेक्षा जास्त विलंबाने दाखल केला असल्याने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३(३) नियम व २००० मधील महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम ९(३) अन्वये अर्जदार यांच्या मुलांच्या जन्माची नोंद करणेबाबतचा आदेश गैरअर्जदार यांना देणे संयुक्तिक होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार शांताबाई गणपत मेडपल्लीवार हिचा मोठा मुलगा नामे नितेश गणपत मेडपल्लीवार याच्या जन्माची नोंद दिनांक २३/०१/१९९२ व लहान मुलगा नामे विवेक गणपत मेडपल्लीवार याच्या जन्माची नोंद दिनांक ०४/१२/१९९४ रोजी करणेचा आदेश निबंधक जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत, सावली, ता. सावली, जि. चंद्रपुर यांना देणेत येतो.

३. अर्जदारने आवश्यक शुल्क अदा करावे.

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2023.01.24 16:30:17 +0530

सावली. **(अ.सं.जगताप)**
दि. २३/०१/२०२३ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सावली.